# माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, मानसिक स्वास्थ आणि शैक्षणिक संपादणूक यावर प्रसार माध्यमाचा होणाऱ्या परिणामांचा अभ्यास

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या पीएच्.डी. (शिक्षणशास्त्र)
पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा
सारांश


संशोधिका

**कु. जयश्री प्र. सावळे**
एम.ए. (मानसशास्त्र), एम.एड्., एम.फिल.

मार्गदर्शक

**डॉ. हृषीकेश दलाई**
सहाय्यक प्राध्यापक
पदव्युत्तर शिक्षण विभाग
क.का.सं.वि., रामटेक



**पदव्युत्तर शिक्षण विभाग**
**कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय**
**रामटेक, जि. नागपूर (महाराष्ट्र)**

**२०१८**

# अनुक्रमणिका


| प्रकरण | विवरण | | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| **१** | **प्रस्तावना** | | **१-९** |
| | १.१ | प्रास्ताविक | १ |
| | १.१.१ | प्रसार माध्यमाचे प्रकार | २ |
| | १.१.२ | प्रसार माध्यमाचे दुष्परिणाम | २ |
| | १.१.३ | प्रसार माध्यमाचे फायदे | ३ |
| | १.१.४ | विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर होणारे परिणाम | ४ |
| | १.२ | संशोधनाचे महत्त्व आणि आवश्यकता | ५ |
| | १.३ | संशोधनाचे विधान | ५ |
| | १.४ | संशोधनातील पदांच्या कार्यात्मक व्याख्या | ६ |
| | १.५ | संशोधनाची उद्दिष्ट्ये | ७ |
| | १.६ | संशोधनाची गृहीतके | ७ |
| | १.७ | संशोधनाच्या परिकल्पना | ७ |
| | १.८ | व्याप्ती व मर्यादा | ८ |
| **२** | **पूर्वसंशोधनाचा आढावा** | | **१०-१५** |
| | २.१ | संबंधित संशोधन साहित्याचा आढावा | १० |
| | २.२ | प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण | १४ |
| **३** | **संशोधन पद्धती, साधने व कार्यवाही** | | **१६-१९** |
| | ३.१ | प्रस्तावना | १६ |
| | ३.२ | संशोधन पद्धती | १६ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ३.३ | प्रस्तुत संशोधनाची पद्धती | १७ |
| | ३.४ | जनसंख्या | १७ |
| | ३.५ | न्यादर्श | १७ |
| | ३.६ | प्रस्तुत संशोधनातील न्यादर्श | १७ |
| | ३.७ | संशोधनाची साधने | १८ |
| | ३.८ | पथदर्शक अभ्यास | १८ |
| | ३.९ | सांख्यिकी विश्लेषणासाठी निवडलेले तंत्र | १९ |
| | ३.१० | संशोधनाची प्रत्यक्ष कार्यवाही | १९ |
| **४** | **सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन** | | **२०-२९** |
| | ४.१ | प्रस्तावना | २० |
| | ४.२ | सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन | २० |
| | ४.३ | परिकल्पनांची पडताळणी | २३ |
| **५** | **सारांश, निष्कर्ष, सूचना व शिफारशी** | | **३०-३९** |
| | ५.१ | सारांश | ३० |
| | ५.३ | निष्कर्ष | ३० |
| | ५.३ | सामान्य निष्कर्ष | ३४ |
| | ५.४ | शिफारशी | ३५ |
| | ५.५ | पुढील संशोधनाची दिशा | ३७ |
| | ५.६ | प्रस्तुत संशोधनातील निष्कर्षाची पूर्व संशोधनातील निष्कर्षाशी तुलना | ३८ |

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना

## १.१ प्रास्ताविक

आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. प्रसार माध्यमे ही जगभर घडणाऱ्या घटनांची माहिती आपल्यापर्यंत पोहचविण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. प्राचीन काळापासून आपले विचार दुसऱ्याला कळावेत, आपल्या कुटुंबातील, गावातील खुशाली दुसऱ्यांना कळावी म्हणून निरोप्याच्या हस्ते निरोपाची देवाण घेवाण करून प्रसार माध्यमांचेच काम साधले जात असे. पुढे हेच कार्य लोककलांच्या माध्यमातून घडू लागले. उदा. कीर्तन, प्रवचन, लोकनाट्य, भारूड, भजन इत्यादी सर्व प्रकारातून श्रोत्यांच्या मनावर उत्तम संस्कार घडविले जात असत.

जस-जसा मानवी विकास होत गेला तस-तशी विविध प्रकारची संवाद साधने निर्माण होत गेली. एखादी बातमी, विविध क्षेत्रात लागणारे नवनवीन शोध, खळबळजनक घटना, क्रीडाक्षेत्रातील घडामोडी, शेअर बाजाराविषयीची माहिती, त्यातील उलाढाली, सरकारच्या नव्या योजना, यापैकी काहीही सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचवायचे असेल तर आजच्या युगात प्रसार माध्यमासारखे दुसरे साधन नाही. याची जाणीव जनमाणसात झाली आणि त्यामुळे प्रसार माध्यमांच्या क्षेत्रात उपग्रहाने फार मोठी क्रांती घडवून आणली. संपूर्ण जग त्यामुळे जवळ आले. दृक, श्राव्य, दृक-श्राव्य अशी जोड साधण्याचे काम ही प्रसार माध्यमे करू लागली. ही सर्व प्रसार माध्यमे आपल्या परीने अतिशय महत्त्वाची आहेत.

### १.१.१ प्रसार माध्यमांचे प्रकार

| **अ) मुद्रित (छापील) (Print Media)** | **ब) अमुद्रित (Electronic)** |
|---|---|
| १) वर्तमानपत्रे | १) आकाशवाणी |
| २) मासिके | २) दूरदर्शन |
| ३) नियतकालिके | ३) संगणक |
| ४) हस्तपुस्तके | ४) इंटरनेट |
| ५) माहिती पुस्तिका | ५) मोबाईल |
| ६) भित्तिपत्रके | ६) डिजिटल क्रांती |
| ७) दिनदर्शिका, दैनंदिनी | ७) फलक |
| ८) लघुचित्रपट | ८) फेसबुक |
| ९) जाहिरातपट | ९) व्हॉट्सॲप |
| १०) चित्रफिती | १०) ट्विटर |

### १.१.२ प्रसार माध्यमाचे दुष्परिणाम :

- जास्तीत जास्त विद्यार्थी हे वर्गात विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरे ही सोशल मिडिया किंवा इंटरनेट सारख्या प्रसार माध्यमांवर शोधतात, त्यामुळे त्यांची पुस्तके वाचण्याची आवड कमी होते व परिणामी क्रियाशिलता कमी होते. कारण इंटरनेटवर सर्व प्रश्नांची उत्तरं ही तयार मिळतात आणि त्यामुळे त्यांची शिकण्याची प्रवृत्ती कमी होते.

- बरेच विद्यार्थी हे एकाच वेळी अनेक गोष्टी करतांना आढळून येतात. उदा. अभ्यासाच्या वेळेस वर्गातच ते इंटरनेटवर ऑनलाईन असतात. तास सुरु असतांना शिक्षक काय शिकवितात यावर त्यांचे कमी लक्ष असते त्यामुळे त्यांचा शालेय स्तर कमी-कमी होत जातो.

- जास्तीत जास्त विद्यार्थी हे सोशल मिडियावर आपला जास्तीत जास्त वेळ वाया घालवित असल्यामुळे समाजात, मित्रांमध्ये न मिसळल्याने त्यांचा समाजाशी, मित्रांशी संपर्क तुटतो आणि ते समाजात असूनही एकटे पडतात. त्यामुळे त्यांच्यात चिडचिडेपणा, एककल्लीपणा, एकटेपण, नैराश्य, वैफल्य ग्रस्तता यासारखे घोर परिणाम दिसून येतात. जास्तीत-जास्त वेळ इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांच्या सानिध्यात राहिल्यामुळे त्यांना त्यांच्या सामाजिक जीवनात, नातेवाईक, मित्रमंडळींशी चर्चाही करता येत नाही, कोणासमोर बोलायलाही ते कचरतात. यातून हळूहळू त्यांचा आत्मविश्वासही कमी होतो व ते एकलकोंडे होत जातात व परिणामी ते मानसिकदृष्ट्या दुर्बल होत जातात.

### १.१.३ प्रसार माध्यमाचे फायदे :

- प्रसार माध्यमाच्या वापरामुळे विद्यार्थ्यांच्यातल्या काही गुणांचा विकास होतो व त्यांचे त्यांच्या वर्गमित्रांसोबत ऑनलाईन का होईना साहचर्य वाढते.
- सोशल मिडिया या सारख्या प्रसार माध्यमाच्या वापराचा फायदा हा जास्तीत जास्त व्यापारी जगताला झाला आहे. कारण त्यांना त्यांच्या व्यवसायाची जाहिरात करावयाची असल्यास सोशल मिडिया सारखी अति जलद सुविधा त्यांचेकडे उपलब्ध आहे. सोशल मिडियाच्या माध्यमातून त्यांना आपल्या व्यवसायाची जाहिरात किंवा माहिती ही अत्यंत कमी वेळात जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचवता येते.
- जास्तीत जास्त वेळ संगणकासमोर घालवल्यामुळे मुलांची नवीन तंत्रज्ञानाशी चांगलीच ओळख होते. शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रगतीसाठी संगणक किंवा इंटरनेट हे अतिशय मोलाचे प्रसारमाध्यम ठरत आहे. त्याद्वारे अनेक विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकसनाचे काम अनावधानाने होत आहे.

### १.१.४ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर होणारे परिणाम

| | | | |
|---|---|---|---|
| १) | स्मरणशक्ती कमी होणे | २) | एकलकोंडेपणा वाढणे |
| ३) | अभिरुची कमी होणे | ४) | अद्‌भूत आणि रोमांचक वातावरणाची सवय |

**मानसिक स्वास्थ :**

मानसाचे जीवन हे सुतासारखे सरळ असत नाही. सुख-दुःख अपेक्षित असते. मानसाच्या जीवनात जसे आनंदाचे क्षण येतात तसेच दुःख आणि अपयशाचे क्षणही त्याला भोगावे लागतात. यश-अपयश, जय-पराजय, सुख-दुःख, यांचा खेळच मानसाच्या जीवनात अखंडपणे चाललेला असतो. सुखासमाधानाने जगणे हे प्रत्येकांपुढील आव्हान असते. जीवनातले अनेक अडथळे पार करीत जीवनाचे ध्येय्य गाठण्याचा प्रयत्न करावा लागतो. जीवन जगतांना समायोजन करावे लागते. प्रत्येक गोष्ट आपल्या मनासारखीच होईल हा आग्रह सोडावा लागतो. आपले जीवन अधिक कार्यक्षमतेने व अधिक जबाबदारीने जगावे लागते. या साऱ्या गोष्टी मानसिक आरोग्याच्या कक्षात पोहचतात.

"Mental Hygiene may be defined as the prevention of mental illness pro of mental health and cure of mental illness."

Crow & Crow

**सर्जनशीलता (Creativity)**

सर्जनशीलता म्हणजे केवळ अलौकिक बुद्धिमत्ता नव्हे तर बुद्धिमत्ता क्षेत्राच्या फार पलीकडे असणारी बाब आहे. सर्जनशीलता ह्या संकल्पनेचा जन्म बुद्धिमत्ता अशी मानसिक शक्ती आहे हे मान्य केल्यानंतर मानसशास्त्रज्ञांनी बुद्धिचे विविध घटक शोधून काढले व त्यावर आधारित अशा बुद्धिच्या विविध व्याख्या, सिद्धांत आणि विविध अशा बुद्धिमापन चाचण्या तयार केल्या.

**गिलफोर्ड -** "सर्जनशीलता म्हणजे केवळ अलौकिक बुद्धिमत्ता नव्हे तर ती बुद्धिमत्ता क्षेत्राच्या फार पलीकडे असणारी बाब आहे."

**टेलर -** "सर्जनशीलता ही एक प्रक्रिया आहे की, जिचे पूनर्वसन नवनिर्मितीत होते आणि ती नूतन कृती पुढे केव्हातरी उपयुक्त, समर्थनीय, संतोषदायक म्हणून गणली जाते."

## १.२ संशोधनाचे महत्त्व आणि आवश्यकता :

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे शिक्षणाचे महत्त्वाचे क्षेत्र आहे. आजची शिक्षण पद्धती ही विद्यार्थी केंद्रीत करण्यात आली आहे. आजचे युग हे तंत्र विज्ञानाचे युग असल्यामुळे कॉम्प्युटर, टि.व्ही, रेडिओ, फेसबुक याचा विद्यार्थी जास्त उपयोग करतात. विद्यार्थी २१ व्या शताब्दीमध्ये असल्यामुळे प्रसार माध्यमामध्ये जास्त रूची दाखवितात. त्यामुळे नव-नवीन शोधकार्य करून ते आपला वेळ घालविण्याचा प्रयत्न करतात. प्रसार माध्यमाच्या अति वापरामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनात ताण-तणाव, चिंता, वैफल्य व व्यवहारांमध्ये बदल दिसत आहे. त्याचा प्रभाव त्यांच्या शिक्षणावर दिसत आहे.

विद्यार्थ्यांना ज्या समस्या येतात त्या सोडविण्यास मदत व्हावी म्हणून संशोधन विषयाची गरज आहे. विद्यार्थ्यांमध्ये असणारा न्यूनगंड कमी करून त्यांना प्रवाहात मिसळण्याचा मार्ग मोकळा करून देता येईल म्हणून प्रस्तुत संशोधन विषयाला अधिक महत्त्व आहे.

## १.३ संशोधनाचे विधान :

**"माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, मानसिक स्वास्थ आणि शैक्षणिक संपादणूक यावर प्रसार माध्यमाचा होणाऱ्या परिणामांचा अभ्यास".**

## १.४ संशोधनातील पदांच्या कार्यात्मक व्याख्या :

**१) माध्यमिक स्तर :**

"इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण देणाऱ्या स्तराला माध्यमिक स्तर असे म्हणतात."

**२) विद्यार्थी :**

"ज्ञान ग्रहण करणारा व्यक्ती म्हणजे विद्यार्थी होय."

**३) सर्जनशीलता :**

"ही एक क्रिया आहे की, ज्याचे पुनर्वसन नवनिर्मितीत होते आणि ती नूतन कृती केव्हातरी उपयुक्त ठरते."

**४) मानसिक स्वास्थ :**

"समायोजन क्षमता, विचार, निरीक्षण, निर्णय, कर्तृत्वशक्ती, बौद्धिक, भावनिक कौशल्याचा विचार, आत्मविश्वास यांचा मानसिक स्वास्थ्यात समावेश होतो."

**५) शैक्षणिक संपादन :**

"माध्यमिक स्तरावरील इयत्ता ९ वी तील विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती म्हणजे शैक्षणिक संपादन होय."

**६) प्रसार माध्यम :**

"प्रसार माध्यम म्हणजे ज्यामध्ये टि.व्ही, रेडीओ, कॉम्पयुटर, वृत्तपत्रे, नियतकालिके, मासिके, फेसबुक, वेबसाईट्स या सर्वांचा समावेश होतो."

**७) परिणाम :**

"एखाद्या विशिष्ट घटकांमुळे दुसऱ्या घटकांवर होणारा बदल म्हणजे परिणाम होय."

## १.५ संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१) माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेवर प्रसार माध्यमाचा होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

२) माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर प्रसार माध्यमाचा होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

३) माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर प्रसार माध्यमाचा होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

४) प्रसार माध्यमाचा विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेवर व मानसिक स्वास्थावर होणाऱ्या परिणामांची तुलना करणे.

५) प्रसार माध्यमाचा विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेवर व शैक्षणिक संपादणुकीवर होणाऱ्या परिणामांची तुलना करणे.

६) प्रसार माध्यमाचा विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्य व शैक्षणिक संपादणुकीवर होणाऱ्या परिणामांची तुलना करणे.

## १.६ संशोधनाची गृहीतके :

१) माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी प्रसार माध्यमाचा अतिशय वापर करतात.

२) प्रत्येक व्यक्तीमध्ये काही अधिक प्रमाणात सर्जनशीलता असते.

३) व्यक्तीची कार्यक्षमता तिच्या मानसिक स्वास्थावर अवलंबून असते.

## १.७ संशोधनाच्या परिकल्पना :

१) माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेवर प्रसार माध्यमाचा धनात्मक परिणाम होत नाही.

२) माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थावर प्रसार माध्यमाचा धनात्मक परिणाम दिसत नाही.

३) माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर प्रसार माध्यमाचा धनात्मक प्रभाव दिसत नाही.

४) प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या आणि अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेमध्ये सार्थक फरक दिसत नाही.

५) प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या आणि अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थामध्ये सार्थक फरक आढळत नाही.

६) प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या आणि अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये सार्थक फरक दिसत नाही.

७) माध्यमिक स्तरावरील अधिकांश विद्यार्थी प्रसार माध्यमाचा अतिशय जास्त प्रमाणात वापर करतात याबाबत मुले आणि मुली यामध्ये फरक आढळत नाही.

८) शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या प्रसार माध्यमाच्या वापरामध्ये सार्थक फरक दिसत नाही.

९) शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेमध्ये सार्थक फरक आढळत नाही.

१०) शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यामध्ये सार्थक फरक आढळत नाही.

११) शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये सार्थक फरक दिसत नाही.

## १.८ व्याप्ती व मर्यादा :

**व्याप्ती :**

"महाराष्ट्र राज्यातील विदर्भ क्षेत्र ही प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती आहे."

**मर्यादा :**

१) प्रस्तुत संशोधनात विदर्भातील नागपूर, अमरावती, यवतमाळ, वर्धा, अकोला, बुलढाणा, वाशिम या ७ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे.

२) प्रस्तुत संशोधनात ७ जिल्ह्यांचा शहरी (Urban) आणि निम शहरी (Sub-Urban) विभागाचा समावेश केला आहे.

३) प्रस्तुत संशोधनास माध्यमिक स्तरावरील ९ व्या वर्गाच्या विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

४) प्रस्तुत संशोधनात प्रत्येक शहरातून १६ माध्यमिक (शहरी ८ आणि निम शहरी ८) शाळांचा समावेश केल्या गेला आहे.

५) प्रस्तुत संशोधनात प्रत्येक शहरातून १६X७ एकूण ११२ शाळांपर्यत मर्यादित आहे.

६) प्रस्तुत संशोधन हे प्रसार माध्यमांपर्यंत मर्यादित आहे.

# प्रकरण दुसरे

# पूर्वसंशोधनाचा आढावा

## २.१ संबंधित संशोधन साहित्याचा आढावा

### १) Burwani, Rupa G. (1991)

"An enquiry into the nature of self-concept in the area of competence and its impact on mental health and academic achievement."

Ph.D. Edu., Vishvabharti Uni. Calcutta

**उद्दिष्टे**

१. क्षमतेच्या वास्तविक 'स्व' संकल्पना आणि आदर्श 'स्व' संकल्पनेचा विस्तार आणि स्वरूपाचा अभ्यास करणे तसेच दोन मधील भेदात्मकतेचा अभ्यास करणे.

२. वास्तविक 'स्व' संकल्पना आदर्श 'स्व' संकल्पना आणि मानसिक आरोग्य, शैक्षणिक संपादन यामधील संबंधाचा अभ्यास करणे.

३. तिनही गटाची वाणिज्य, विज्ञान आणि मिश्र गटाची तुलना करणे.

**निष्कर्ष**

१. वास्तविक 'स्व' संकल्पना प्राप्तांक, आदर्श 'स्व' संकल्पना प्राप्तांक, वास्तविक आदर्श भेदन प्राप्तांक आणि मानसिक आरोग्य प्राप्तांक कमी जास्त सामान्यपणे नमुन्यात विभागलेले होते. या चलांच्या प्राप्तांकामध्ये तीनही गट वेगवेगळे नव्हते.

२. वास्तविक 'स्व' संकल्पना आणि आदर्श 'स्व' संकल्पना उच्च सहसंबंधित होत्या.

३. उच्च वास्तविक 'स्व' संकल्पना प्राप्तांक असणाऱ्या विद्यार्थ्यांनी निम्न भेदन प्राप्तांक दर्शविला.

४. उच्च आदर्श 'स्व' संकल्पना मानसिक आरोग्यांशी उपयोगी असल्याचे लक्षात आले होते.

५. वास्तविक आणि आदर्श 'स्व' संकल्पना मधील भेदाभेदन मानसिक आजार आरोग्याशी साहचर्यीत होत्या.

६. वास्तविक आणि आदर्श 'स्व' संकल्पनामधील भेदाभेदाने वाणिज्य गटातील शैक्षणिक संपादनावर परिणाम केलेला नव्हता. परंतु विज्ञान गटातील शैक्षणिक संपादनावर परिणाम केलेला होता.

## २) **Pandey, R.N. (1980)**

"Differences in Mental Ability among social classes."

Ph.D. Psy., DDU. Uni. Gorakhpur

**उद्दिष्ट्ये**

उच्च सामाजिक वर्ग, उच्च मध्यम सामाजिक वर्ग, निम्न-मध्यम सामाजिक वर्ग, उच्च-निम्न सामाजिक वर्ग, निम्न-निम्न सामाजिक वर्गाच्या सामान्य मानसिक क्षमतांचा अभ्यास करणे.

**निष्कर्ष**

१. सामान्य मानसिक क्षमतांच्या गुणांमध्ये सर्व सामाजिक वर्गामध्ये भिन्नता आढळून आली.

२. वेगवेगळ्या घटकांवर सामान्य मानसिक क्षमतांच्या कसोटीमध्ये उच्च वर्गातील विद्यार्थ्यांनी चांगले गुण प्राप्त केले.

३. वयामध्ये होणारी वाढ आणि शिक्षण यांच्या तुलनेत सामान्य मानसिक क्षमता मधील फरक कमी आढळून आला.

४. सामाजिक स्तरातील फरकाला सामान्य मानसिक क्षमता संवेदनक्षम असलेल्या आढळून आल्या, जर विद्यार्थी उच्च सामाजिक वर्गातील असेल तर त्यांच्या सामान्य मानसिक क्षमता उच्च आढळण्याची संधी असते.

## ३) रोकडे, मीना (२००५)

"कौमार्यावस्थेतील विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता, सामाजिक आर्थिक स्तर, शैक्षणिक चिंता, व्यक्तिमत्व समायोजन आणि शैक्षणिक संपादन यांच्या संबंधाचा अभ्यास"

पीएच.डी., शिक्षण, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

**उद्दिष्ट्ये**

१. शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील वर्ग ९ मध्ये अध्ययन करणाऱ्या मुले व मुली यांच्या बुद्धिमत्तेचा शोध घेणे.

२. शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील वर्ग ९ मध्ये अध्ययन करणाऱ्या मुले व मुली यांच्या सामाजिक स्तर आणि शैक्षणिक संपादनातील सहसंबंधाचा शोध घेणे.

३. शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील वर्ग ९ मध्ये अध्ययन करणाऱ्या मुले व मुली यांच्या आर्थिक स्तर आणि शैक्षणिक संपादनातील सहसंबंधाचा शोध घेणे.

४. शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील वर्ग ९ मध्ये अध्ययन करणाऱ्या मुले व मुली यांच्या व्यक्तिगत समायोजन व शैक्षणिक संपादनातील सहसंबंधाचा शोध घेणे.

५. शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील वर्ग ९ मध्ये अध्ययन करणाऱ्या मुले व मुली यांच्या बुद्धिमत्ता, सामाजिक-आर्थिक स्तर, शैक्षणिक चिंता, व्यक्तिमत्व समायोजन आणि शैक्षणिक संपादन यांच्या सहसंबंधाचा शोध घेणे.

**निष्कर्ष**

१. शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता आणि शैक्षणिक संपादन यात फार मोठ्या प्रमाणात सकारात्मक सार्थक सहसंबंध आढळला.

२. शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सामाजिक स्तर व शैक्षणिक संपादन यात फार सकारात्मक सार्थक सहसंबंध आढळला.

३. शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आर्थिक स्तर व शैक्षणिक संपादन यात फार मोठ्या प्रमाणात सकारात्मक सार्थक सहसंबंध आढळला.

**४) Anand, S.P. (1989)**

"Mental health of high school students."

Indian Educational Review Vol. 24, No. 2

**उद्दिष्ट्ये**

१. उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्याचा अभ्यास करणे.

**निष्कर्ष**

१. कौमार्यावस्थेतील उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य, त्यांचे शैक्षणिक संपादन याचा पालकांच्या शैक्षणिक व व्यावसायिक दर्जाशी सक्रिय संबंध आढळला.

**५) बन्सी बिहारी पण्डित (१९९७)**

"शिक्षकांच्या संगणक अभिवृत्तीचा अभ्यास करणे"

- पीएच.डी. शिक्षण., जळगाव विद्यापीठ, जळगाव.

**उद्दिष्ट्ये -**

१) शिक्षकांच्या संगणक अभिवृत्तीचा शोध घेणे.

२) शिक्षकांच्या बोधात्मक संगणक अभिवृत्तीचा शोध घेणे.

३) शिक्षकांच्या भावात्मक संगणक अभिवृत्तीचा शोध घेणे.

४) लिंगभेद, विद्याशाखा आणि संगणक साक्षरता या चल घटकांमुळे शिक्षकांच्या संगणक अभिवृत्तीत, बोधात्मक संगणक अभिवृत्तीचा व भावात्मक संगणक अभिवृत्तीत सार्थक फरक आढळतो काय याचा अभ्यास करणे.

**निष्कर्ष -**

१) पुरुष आणि स्त्री शिक्षकांची संगणक अभिवृत्ती अनुकूल आहे.

२) संगणक अभिवृत्तीवर लिंगभेद व विद्याशाखेचा परिणाम दिसून येत नाही.

३) संगणक निरक्षर, शिक्षकांच्या तुलनेने संगणक साक्षर, शिक्षकांची संगणक अभिवृत्ती अधिक अनुकूल असते.

४) संगणक साक्षर गटांमध्ये स्त्री शिक्षकांच्या तुलनेने पुरुष शिक्षकांची संगणक अभिवृत्ती अधिक अनुकूल असते.

## २.२ प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण

या प्रकरणात प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित पूर्व संशोधनाचा आढावा घेतलेला आहे. आढावा घेतांना संशोधनाशी संबंधित उद्दिष्ट्ये व निष्कर्षाचा अभ्यास केलेला आहे. पूर्व संशोधनाचा आढावा घेतल्यानंतर लक्षात आले की, मानसिक आरोग्य, व्यक्तिमत्व, बुद्धिमत्ता या संबंधित बरीच संशोधने पूर्वी झालेली आहेत. परंतु विषयाशी तंतोतंत जुळणारे संशोधन झालेले नाही. संशोधिकेने संशोधनाकरिता घेतलेले न्यादर्श जनसंख्या ही पूर्वीच्या संशोधकापेक्षा पूर्णपणे वेगळी आहेत, करीता हे संशोधन पूर्वी झालेल्या संशोधनापेक्षा भिन्न आहे.

यापूर्वी झालेल्या संशोधनात विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, मानसिक स्वास्थ आणि शैक्षणिक संपादणुक यावर प्रसार माध्यमाचा होणाऱ्या परिणामाचा कुठेच विचार केलेला नाही.

प्रस्तुत संशोधनात माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, मानसिक स्वास्थ आणि शैक्षणिक संपादणूक यावर प्रसार माध्यमाचा होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. कारण की विद्यार्थी हे कौमार्यावस्थेतील असल्यामुळे त्यांचा हा काळ खूप महत्त्वाचा असतो. सामान्यतः माध्यमिक शाळेतील विद्यार्थी हा १४ ते १६ वयोगटातील असल्यामुळे या वयात त्यांच्या भविष्याला एक वेगळी दिशा मिळणार असते.

आजचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे. विद्यार्थ्यांना दिवसेंदिवस नवीन नवीन माहिती मिळत आहे. आजची शिक्षणप्रणाली ही विद्यार्थी केंद्रित आहे. आधुनिक काळामध्ये शिक्षणामध्ये आमूलाग्र बदल घडून आलेले आहे. त्या सर्वांचा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वावर, बुद्धिमत्तेवर परिणाम होत आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होत आहे. त्याचप्रमाणे ह्या सर्वांचा परिणाम शैक्षणिक संपादणूक, मानसिक स्वास्थ्यावरही होत आहे. व्यक्तिनुसार, परिस्थितीनुसार, काळानुसार परिवर्तन होत चालले आहे म्हणूनच प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, मानसिक स्वास्थ आणि शैक्षणिक संपादणूक यावर प्रसार माध्यमांचा होणाऱ्या परिणामांचा अभ्यास नविन दृष्टिकोनाने करण्यात आलेला आहे.

वरील विवेचनावरून लक्षात येते की, प्रस्तुत संशोधनाचे कार्यक्षेत्र आणि उद्दिष्ट्ये हे संबंधित क्षेत्रातील पूर्व संशोधनापेक्षा पूर्णतः वेगळे आहे.

# प्रकरण तिसरे

# संशोधन पद्धती, साधने व कार्यवाही

## ३.१ प्रस्तावना

संशोधनाचा प्रमुख हेतू नवे ज्ञान प्राप्त करणे, विद्यमान तथ्याबद्दल नवा दृष्टिकोन प्रस्तुत करणे, घटनांचे विश्लेषण करून त्यातील संबंध प्रस्थापित करणे, जुन्या मापन साधनांमध्ये सुधारणा घडवून आणणे किंवा अधिक कार्यक्षम नवी साधने तयार करणे आणि या सर्वांद्वारे जगाबद्दलचे आपले एकंदर ज्ञान वाढवून मानवाच्या प्रगतीला पोषक परिस्थिती निर्माण करणे होय.

"संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्त्वे अथवा तथ्य शोधण्यासाठी आणि जुनी तथ्ये आणि तत्त्वे परीक्षणासाठी केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास होय."

- वेबस्टर कोश

"वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी एखाद्या विषयाचा बारकाईने केलेला समिश्रात्मक अभ्यास किंवा वैज्ञानिक चिकित्सा म्हणजे संशोधन होय."

## ३.२ संशोधन पद्धती

संशोधन पद्धतीचे मुख्यतः तीन भागात वर्गीकरण करण्यात येते.

१. ऐतिहासिक संशोधन पद्धती (Historical Method)

२. प्रयोगात्मक संशोधन पद्धती (Experimental Method)

३. वर्णनात्मक संशोधन पद्धती (Descriptive Method)

## ३.३ प्रस्तुत संशोधनाची पद्धती

प्रस्तुत संशोधनाचा विषय हा वर्तमान परिस्थितीचा अभ्यास करणारा आहे. आजचे युग स्पर्धेचे युग, जिकडे तिकडे प्रत्येक विद्यार्थी स्पर्धा, शिक्षक पालक यांच्या अपेक्षा, सभोवतालचे वातावरण यामुळे दडपणात वावरतो आहे. याचाच परिणाम म्हणजे विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य धोक्यात येत आहे. हे अभ्यासण्यासाठी सर्वेक्षण पद्धती अतिशय उपयुक्त आहे. प्रस्तुत संशोधनासाठी **सर्वेक्षण पद्धतीची** निवड करण्यात आलेली आहे.

## ३.४ जनसंख्या

संशोधन प्रक्रियेत संपूर्ण जनसंख्येचा समावेश करणे हे अशक्य नसले तरी बऱ्याच वेळा अत्यंत त्रासदायक ठरते. त्यामुळे खर्च वाढतो व वेळही फार लागतो. याचाच परिणाम म्हणून जनसंख्येला प्रतिनिधिक म्हणजेच न्यादर्श निवडला जातो.

प्रस्तुत संशोधनाकरिता पूर्ण विदर्भातील माध्यमिक वर्गातील सर्व विद्यार्थी जनसंख्या आहे.

## ३.५ न्यादर्श

संशोधनाचे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता सर्वात महत्त्वाची व आवश्यक बाब म्हणजे सुयोग्य निवड करणे, जनसंख्येचे प्रतिनिधीत्व करू शकणाऱ्या एका लहान गटाची निवड करावी लागते, त्याला न्यादर्श असे म्हणतात.

## ३.६ प्रस्तुत संशोधनातील न्यादर्श

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने विदर्भातील ७ जिल्ह्यांचा अभ्यास केलेला आहे आणि न्यादर्श म्हणून संशोधनामध्ये यादृचिछक पद्धतीचा अवलंब करण्यात आला. या पद्धतीनुसार ११२ शाळांची निवड करण्यात आली. प्रत्येक जिल्ह्यातून १६ शाळा (यामध्ये ८ शहरी व ८ निमशहरी) शाळांची निवड करण्यात आली.

त्यापैकी प्रत्येक माध्यमिक शाळातून १० मुले व १० मुलींची निवड करण्यात आली यामध्ये ११२ माध्यमिक शाळांमधून २२४० विद्यार्थ्यांची न्यादर्श म्हणून निवड करण्यात आली.

## ३.७ संशोधनाची साधने

प्रस्तुत संशोधनाकरिता संशोधिकेने स्वनिर्मित प्रश्नावली तसेच प्रमाणित चाचण्यांची निवड करण्यात आली. या साधनाद्वारे माहिती संकलित करून संशोधन केलेले आहे.

प्रस्तुत संशोधनात संशोधिकीने मानसशास्त्रीय प्रमाणित चाचण्यांचा उपयोग केलेला आहे.

१) सर्जनशीलता - Dr. Baqer Mehdi

Verbal test of Creative Thinking (TCW)

२) मानसिक स्वास्थ - Dr. C.D. Agashe and Dr. R.D. Helode

Positive Mental Health Inventory (PMHI)

शैक्षणिक संपादणुकीकरिता न्यादर्शात निवडलेल्या ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या मागील तीन वर्षांचे वार्षिक परिक्षेचे गुण घेऊन त्यांची सरासरी काढण्यात आली.

## ३.८ पथदर्शक अभ्यास

"प्रत्यक्ष संशोधन करताना येणाऱ्या अडचणींचा पूर्वीचा अंदाज घेऊन त्या अडचणी दूर व्हाव्यात या हेतूने अत्यंत लहान प्रमाणात पण वैज्ञानिक पद्धतीने संपूर्ण संशोधन प्रक्रिया पूर्ण करणे म्हणजे पथदर्शक अभ्यास होय."

प्रस्तुत संशोधनात संशोधिकेने २ माध्यमिक विद्यालयाची सहेतूक पद्धतीने निवड केलेली आहे. संशोधनातील उद्दिष्टानुसार सर्जनशीलता व मानसिक स्वास्थ्य यावर प्रसार माध्यमांचा होणारा परिणाम विषयक प्रश्नावली ५ विषय तंत्राकडून तपासून घेण्यात आली. त्यांच्याद्वारे सांगण्यात आलेल्या त्रुटींची दुरूस्ती करून नंतर ती प्रश्नावली संशोधनासाठी निवडलेल्या ३० विद्यार्थ्यांना सोडविण्यासाठी देण्यात आली दिलेल्या प्रतिसादानुसार गुणदान करून प्रश्नावलीचे मूल्यांकन करण्यात आले.

## ३.९ सांख्यिकी विश्लेषणासाठी निवडलेले तंत्र

१) मध्यमान (Mean)

२) प्रमाण विचलन (Standard Deviation)

३) टी परिक्षण ('t' Test)

४) सहसंबंध (Correlation)

## ३.१० संशोधनाची प्रत्यक्ष कार्यवाही

विदर्भ विभागातील नागपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम हे ७ जिल्हे शहरी आणि निमशहरी विभाग संशोधनाकरिता निवडण्यात आले. प्रत्येक जिल्ह्यातून १६ माध्यमिक शाळांची निवड करण्यात आली. त्यामध्ये ८ शहरी शाळा व ८ निमशहरी शाळांचा समावेश करण्यात आल. त्यामध्ये प्रत्येक शाळेतून १० मुले व १० मुली यांची निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांना सर्जनशीलता, मानसिक स्वास्थ आणि सर्जनशीलता व मानसिक स्वास्थ यावर प्रसार माध्यमाचा होणारा परिणाम जाणून घेण्यामागे प्रश्नावली देण्यात आली व या प्रश्नावलीच्या साहाय्याने आधारभूत माहिती संकलित केली. तसेच संकलित माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण करण्यात आले व निष्कर्ष काढण्यात आले.

# प्रकरण चौथे

# सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन

## ४.१ प्रस्तावना

संकलित माहितीचे अथवा तथ्यांचे विश्लेषण करावे लागते त्यासाठी संकलित माहितीचे संघटन करून परिकल्पनेची पडताळणी करण्यासाठी विश्लेषणाची गरज असते.

## ४.२ सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन

**सारणी क्र. ४.१**

**प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या आणि अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सर्जनशिलतेच्या मध्यमानाची तुलना**

| गट | विद्यार्थी संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | स्वाधिनता मात्रा | प्रमाण त्रुटी | मध्यमाना-तील फरक | प्राप्त 't' मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उचित वापर करणारे | ९६० | ५४.५५ | १९.६२०७ | २१९८ | ०.८१३१ | १५.९१ | १९.५६७* |
| अति वापर करणारे | १२४० | ३८.६४ | १७.९५९८ | | | | |

०.०५ सार्थकता स्तरावरील सारणी 't' मूल्य १.९६० *०.०५ सार्थकता स्तरावर सार्थक

सारणीवरून असे स्पष्ट होते की, प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या आणि अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सर्जनशिलतेमध्ये सार्थक फरक असून प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता कमी प्रमाणात असल्याचे आढळून येते.

## सारणी क्र. ४.२

### प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या आणि अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्याच्या मध्यमानाची तुलना

| गट | विद्यार्थी संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | स्वाधिनता मात्रा | प्रमाण त्रुटी | मध्यमाना-तील फरक | प्राप्त 't' मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उचित वापर करणारे | ९६० | २९.८६ | ५.२८३३ | २१९८ | ०.२१९० | १२.५८ | ५७.४५३* |
| अति वापर करणारे | १२४० | १७.२८ | ४.८३७० | | | | |

०.०५ सार्थकता स्तरावरील सारणी 't' मूल्य १.९६० *०.०५ सार्थकता स्तरावर सार्थक

सारणीवरून असे स्पष्ट होते की, प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या आणि अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यामध्ये सार्थक फरक असून प्रसार माध्यमाचा अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत उचित वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य अधिक चांगले असल्याचे दिसून येते.

## सारणी क्र. ४.३

### प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या आणि अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीच्या मध्यमानाची तुलना

| गट | विद्यार्थी संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | स्वाधिनता मात्रा | प्रमाण त्रुटी | मध्यमाना-तील फरक | प्राप्त 't' मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उचित वापर करणारे | ९६० | ८३.४१ | ११.७२१९ | २१९८ | ०.५०२६ | २६.६७ | ५३.०६९* |
| अति वापर करणारे | १२४० | ५६.७४ | ११.६४९० | | | | |

०.०५ सार्थकता स्तरावरील सारणी 't' मूल्य १.९६० *०.०५ सार्थकता स्तरावर सार्थक

सारणीवरून असे स्पष्ट होते की, प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या आणि अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये सार्थक फरक असून प्रसार माध्यमांचा अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत उचित वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक अधिक चांगली आढळून येते.

**सारणी क्र. ४.४**

**प्रसार माध्यमाचा वापर आणि सर्जनशीलता यामधील सहसंबंध दर्शविणारी सारणी**

| गट | संख्या | चल | स्वाधीनता मात्रा | प्राप्त सहसंबंध गुणक | सार्थकता स्तर | अपेक्षित सहसंबंध गुणक | सार्थक आहे/नाही |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण विद्यार्थी | २२०० | प्रसार माध्यमाचा वापर व सर्जनशीलता | २१९८ | ०.५३१ | ०.०५ | .०१९६ | आहे |

सारणीवरून असे स्पष्ट होते की, प्रसार माध्यमाच्या वापरानुसार विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेमध्ये मध्यम प्रमाणात वाढ होते. अर्थात प्रसार माध्यमाच्या उचित वापरामुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेमध्येही मध्यम प्रमाणात वाढ होते.

**सारणी क्र. ४.५**

**प्रसार माध्यमाचा वापर आणि मानसिक स्वास्थ्य यामधील सहसंबंध दर्शविणारी सारणी**

| गट | संख्या | चल | स्वाधीनता मात्रा | प्राप्त सहसंबंध गुणक | सार्थकता स्तर | अपेक्षित सहसंबंध गुणक | सार्थक आहे/नाही |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण विद्यार्थी | २२०० | प्रसार माध्यमाचा वापर व मानसिक स्वास्थ्य | २१९८ | ०.८६२ | ०.०५ | .०१९६ | आहे |

सारणीवरून असे स्पष्ट होते की, प्रसार माध्यमाच्या वापरानुसार विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यामध्येही वाढ होते. अर्थात प्रसार माध्यमाच्या उचित वापरामुळे विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यामध्येही वाढ होते.

**सारणी क्र. ४.६**

**प्रसार माध्यमाचा वापर आणि शैक्षणिक संपादणूक यामधील सहसंबंध दर्शविणारी सारणी**

| गट | संख्या | चल | स्वाधीनता मात्रा | प्राप्त सहसंबंध गुणक | सार्थकता स्तर | अपेक्षित सहसंबंध गुणक | सार्थक आहे/नाही |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण विद्यार्थी | २२०० | प्रसार माध्यमाचा वापर व शैक्षणिक संपादणूक | २१९८ | ०.८४६ | ०.०५ | .०१९६ | आहे |

सारणीवरून असे स्पष्ट होते की, प्रसार माध्यमाच्या वापरानुसार विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्येही वाढ होते. अर्थात प्रसार माध्यमाच्या उचित वापरामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्येही वाढ होते.

## ४.३ परिकल्पनेची पडताळणी

१) माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेवर प्रसार माध्यमाचा धनात्मक परिणाम होत नाही.

प्रसार माध्यमाचा वापर आणि विद्यार्थ्यांची सर्जनशीलता यामधील प्राप्त सहसंबंध गुणक मूल्य ०.५३१ असून प्राप्त सहसंबंध गुणक मूल्य ०.०५ स्तरावर स्वाधीनता मात्रा २१९८ करीता अपेक्षित मूल्य ०.०१९६ पेक्षा अधिक असल्यामुळे सार्थक आहे.

उपरोक्त विश्लेषणावरून स्पष्ट होते की, प्रसार माध्यमाचा वापर आणि विद्यार्थ्यांची सर्जनशीलता यामध्ये धनात्मक मध्यम प्रतीचा सार्थक सहसंबंध आहे. अर्थात प्रसार माध्यमाच्या उचित वापरामुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेमध्येही मध्यम प्रमाणात वाढ होते. त्यामुळे उपरोक्त परिकल्पना अस्वीकृत करण्यात आली.

२) माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर प्रसार माध्यमाचा धनात्मक परिणाम दिसत नाही.

प्रसार माध्यमाचा वापर आणि विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ यामधील प्राप्त सहसंबंध गुणक मूल्य ०.८६२ असून प्राप्त सहसंबंध गुणक मूल्य ०.०५ स्तरावर स्वाधीनता मात्रा २१९८ करीता अपेक्षित मूल्य ०.०१९६ पेक्षा अधिक असल्यामुळे सार्थक आहे.

उपरोक्त विश्लेषणावरून स्पष्ट होते की, प्रसार माध्यमाचा वापर आणि विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ यामध्ये धनात्मक घनिष्ठ सार्थक सहसंबंध आहे. प्रसार माध्यमाच्या वापरानुसार विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यामध्येही वाढ होते. त्यामुळे उपरोक्त परिकल्पना अस्वीकृत करण्यात आली.

३) माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर प्रसार माध्यमाचा धनात्मक प्रभाव दिसत नाही.

प्रसार माध्यमाचा वापर आणि विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक यामधील प्राप्त सहसंबंध गुणक मूल्य ०.८४६ असून प्राप्त सहसंबंध गुणक मूल्य ०.०५ स्तरावर स्वाधीनता मात्रा २१९८ करीता अपेक्षित मूल्य ०.०१९६ पेक्षा अधिक असल्यामुळे सार्थक आहे.

उपरोक्त विश्लेषणावरून स्पष्ट होते की, प्रसार माध्यमाचा वापर आणि विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक यामध्ये धनात्मक घनिष्ठ सार्थक सहसंबंध आहे. अर्थात प्रसार

माध्यमाच्या उचित वापरामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्येही वाढ होते. म्हणून उपरोक्त परिकल्पना अस्वीकृत केली जाते.

४) प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या आणि अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेमध्ये सार्थक फरक दिसत नाही.

प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या आणि अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे प्राप्त 't' मूल्य १९.५६७ हे स्वाधिनता मात्रा २१९८ आणि ०.०५ सार्थकता स्तरावरील सारणी 't' मूल्य १.९६० पेक्षा फारच अधिक असल्यामुळे सार्थक आहे. प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे मध्यमान ५४.५५ असून अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांचे ३८.६४ आहे.

उपरोक्त विश्लेषणावरून स्पष्ट होते की, प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या आणि अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेमध्ये सार्थक फरक असून प्रसार माध्यमांचा उचित वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता कमी प्रमाणात असल्याचे आढळून येते. त्यामुळे उपरोक्त परिकल्पना अस्वीकृत करण्यात आली.

५) प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या आणि अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यामध्ये सार्थक फरक आढळत नाही.

प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या आणि अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्याचे प्राप्त 't' मूल्य ५७.४५३ हे स्वाधिनता मात्रा २१९८ आणि ०.०५ सार्थकता स्तरावरील सारणी 't' मूल्य १.९६० पेक्षा फारच अधिक असल्यामुळे सार्थक आहे. प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्याचे मध्यमान २९.८६ असून अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मध्यमान १७.२८ आहे.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या आणि अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यामध्ये सार्थक फरक असून प्रसार माध्यमांचा अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत उचित वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ अधिक चांगले असल्याचे दिसून येते. म्हणून उपरोक्त परिकल्पना अस्वीकृत केली जाते.

६) प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या आणि अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये सार्थक फरक दिसत नाही.

प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या आणि अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीचे प्राप्त 't' मूल्य ५३.०६९ हे स्वाधिनता मात्रा २१९८ आणि ०.०५ सार्थकता स्तरावरील सारणी 't' मूल्य १.९६० पेक्षा अधिक असल्यामुळे सार्थक आहे. प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीचे मध्यमान ८३.४१ असून अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मध्यमान ५६.७४ आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या आणि अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये सार्थक फरक असून प्रसार माध्यमांचा अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत उचित वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक अधिक चांगली आढळून येते. त्यामुळे उपरोक्त परिकल्पना अस्वीकृत करण्यात आली.

७) माध्यमिक स्तरावरील अधिकांश विद्यार्थी प्रसार माध्यमाचा अतिशय जास्त प्रमाणात वापर करतात याबाबत मुले आणि मुली यामध्ये फरक आढळत नाही.

एकूण मुलांपैकी सर्वाधिक ९२.४५% मुले प्रसार माध्यमाचा अतिशय जास्त प्रमाणात वापर करीत असून उचित वापर करणाऱ्या मुलांचे प्रमाण अत्यल्प ७.५५% आहे.

मात्र एकूण मुलींपैकी ७९.७३% मुली प्रसार माध्यमांचा उचित वापर करीत असून फक्त २०.२७% मुलीच अतिशय जास्त प्रमाणात वापर करतांना आढळून येते.

उपरोक्त विश्लेषणावरून असे स्पष्ट होते की, माध्यमिक स्तरावरील अधिकांश विद्यार्थी प्रसार माध्यमांचा अतिशय जास्त प्रमाणात वापर करतात. यामध्ये मुलींच्या तुलनेत मुलांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून आले. म्हणून उपरोक्त परिकल्पना अंशतः स्वीकृत केली जाते.

८) शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या प्रसार माध्यमाच्या वापरामध्ये सार्थक फरक दिसत नाही.

शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या प्रसार माध्यमाच्या वापराबाबत प्राप्त 't' मूल्य ९.५८२ हे स्वाधिनता मात्रा २१९८ आणि ०.०५ सार्थकता स्तरावरील सारणी 't' मूल्य १.९६० पेक्षा अधिक असल्यामुळे सार्थक आहे. शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे प्रसार माध्यमाच्या वापरासंबंधी मध्यमान ६६.६३ असून निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे ७३.७९ आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांमध्ये प्रसार माध्यमाच्या वापराबाबत सार्थक फरक असून शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थी प्रसार माध्यमांचा उचित वापर करीत असल्याचे दिसून येते. त्यामुळे उपरोक्त परिकल्पना अस्वीकृत केली जाते.

९) शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेमध्ये सार्थक फरक आढळत नाही.

शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे प्राप्त 't' मूल्य ३.६३८ हे स्वाधिनता मात्रा २१९८ आणि ०.०५ सार्थकता स्तरावरील सारणी 't' मूल्य १.९६० पेक्षा अधिक असल्यामुळे सार्थक आहे. शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे मध्यमान ४४.०१ असून निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे ४७.१५ आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेमध्ये सार्थक फरक असून शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता अधिक असल्याचे आढळून आले. म्हणून उपरोक्त परिकल्पना अस्वीकृत करण्यात आली.

१०) शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यामध्ये सार्थक फरक आढळत नाही.

शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्याचे प्राप्त 't' मूल्य ७.८५७ हे स्वाधिनता मात्रा २१९८ आणि ०.०५ सार्थकता स्तरावरील सारणी 't' मूल्य १.९६० पेक्षा अधिक असल्यामुळे सार्थक आहे. शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्याचे मध्यमान २१.४५ असून निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे मध्यमान २४.१० आहे.

उपरोक्त विश्लेषणावरून असे स्पष्ट होते की, शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यामध्ये सार्थक फरक असून शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ अधिक चांगले असल्याचे दिसून येते. त्यामुळे उपरोक्त परिकल्पना अस्वीकृत केली जाते.

११) शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये सार्थक फरक दिसत नाही.

शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीचे प्राप्त 't' मूल्य ८.४५२ हे स्वाधिनता मात्रा २१९८ आणि ०.०५ सार्थकता स्तरावरील सारणी 't' मूल्य १.९६० पेक्षा अधिक असल्यामुळे सार्थक आहे. शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीचे मध्यमान ६५.२५ असून निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे मध्यमान ७१.५१ आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये सार्थक फरक असून शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक अधिक चांगली आढळून येते. म्हणून उपरोक्त परिकल्पना अस्वीकृत करण्यात आली.

### प्रकरण पाचवे

# सारांश, निष्कर्ष, सूचना व शिफारशी

संशोधनाच्या कार्याचा शेवटचा टप्पा म्हणजे निष्कर्ष व सूचना होय. प्रस्तुत संशोधनाचे कार्य पूर्ण झाल्यावर निष्कर्ष काढण्यात आले. त्याकरिता पुढीलप्रमाणे संशोधनाचे कार्य करण्यात आले.

## ५.१ सारांश

संशोधनकार्याचे स्वरूप निश्चित केल्यानंतर कार्य सफल व्हावे म्हणून कार्याचे स्त्रोत निश्चित केल्या गेले. हे संपूर्ण कार्य पाच प्रकरणामध्ये विभागले गेले.

## ५.२ निष्कर्ष

१) माध्यमिक स्तरावरील अधिकांश विद्यार्थी प्रसार माध्यमाचा अतिशय जास्त प्रमाणात वापर करतात. यामध्ये मुलींच्या तुलनेत मुलांचे तसेच शहरी क्षेत्राच्या तुलनेत निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते.

२) प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या आणि अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेमध्ये सार्थक फरक असून प्रसार माध्यमांचा उचित वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता कमी प्रमाणात असल्याचे आढळून येते.

३) प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या आणि अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यामध्ये सार्थक फरक असून प्रसार माध्यमाचा अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत उचित वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ अधिक चांगले असल्याचे दिसून येते.

४) प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या आणि अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये सार्थक फरक असून प्रसार माध्यमांचा अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत उचित वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक अधिक चांगली आढळून येते.

५) मुले आणि मुलींच्या सर्जनशीलतेमध्ये सार्थक फरक असून मुलांच्या तुलनेत मुलींमध्ये सर्जनशीलता अधिक असल्याचे आढळून येते.

६) मुले आणि मुलींच्या मानसिक स्वास्थ्यामध्ये सार्थक फरक असून मुलांच्या तुलनेत मुलींचे मानसिक स्वास्थ अधिक चांगले असल्याचे दिसून येते.

७) मुले आणि मुलींच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये सार्थक फरक असून मुलांच्या तुलनेत मुलींची शैक्षणिक संपादणूक अधिक चांगली आढळून येते.

८) मुले आणि मुली यांच्यामध्ये प्रसार माध्यमाच्या वापराबाबत सार्थक फरक असून मुलांच्या तुलनेत मुली प्रसार माध्यमांचा उचित वापर करीत असल्याचे दिसून येते.

९) शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेमध्ये सार्थक फरक असून शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता अधिक असल्याचे आढळून येते.

१०) शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यामध्ये सार्थक फरक असून शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ अधिक चांगले असल्याचे दिसून येते.

११) शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये सार्थक फरक असून शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक अधिक चांगली आढळून येते.

१२) शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांमध्ये प्रसार माध्यमाच्या वापराबाबत सार्थक फरक असून शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थी प्रसार माध्यमांचा उचित वापर करीत असल्याचे दिसून येते.

१३) शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील मुलांच्या सर्जनशीलतेमध्ये सार्थक फरक असून शहरी क्षेत्रातील मुलांच्या तुलनेत निम-शहरी क्षेत्रातील मुलांमध्ये सर्जनशीलता अधिक असल्याचे आढळून येते.

१४) शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील मुलांच्या मानसिक स्वास्थ्यामध्ये सार्थक फरक असून शहरी क्षेत्रातील मुलांच्या तुलनेत निम-शहरी क्षेत्रातील मुलांचे मानसिक स्वास्थ अधिक चांगले असल्याचे दिसून येते.

१५) शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील मुलांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये सार्थक फरक असून शहरी क्षेत्रातील मुलांच्या तुलनेत निम-शहरी क्षेत्रातील मुलांची शैक्षणिक संपादणूक अधिक चांगली आढळून येते.

१६) शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील मुलांमध्ये प्रसार माध्यमाच्या वापराबाबत सार्थक फरक असून शहरी क्षेत्रातील मुलांच्या तुलनेत निम-शहरी क्षेत्रातील मुले प्रसार माध्यमांचा उचित वापर करीत असल्याचे दिसून येते.

१७) शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील मुलींच्या सर्जनशीलतेमध्ये सार्थक फरक असून शहरी क्षेत्रातील मुलींच्या तुलनेत निम-शहरी क्षेत्रातील मुलींमध्ये सर्जनशीलता अधिक असल्याचे आढळून येते.

१८) शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील मुलींच्या मानसिक स्वास्थ्यामध्ये सार्थक फरक असून शहरी क्षेत्रातील मुलींच्या तुलनेत निम-शहरी क्षेत्रातील मुलींचे मानसिक स्वास्थ अधिक चांगले असल्याचे दिसून येते.

२०) शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील मुलींच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये सार्थक फरक असून शहरी क्षेत्रातील मुलींच्या तुलनेत निम-शहरी क्षेत्रातील मुलींची शैक्षणिक संपादणूक अधिक चांगली आढळून येते.

२१) शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील मुलींमध्ये प्रसार माध्यमाच्या वापराबाबत सार्थक फरक असून शहरी क्षेत्रातील मुलींच्या तुलनेत निम-शहरी क्षेत्रातील मुली प्रसार माध्यमाचा उचित वापर करीत असल्याचे दिसून येते.

२२) प्रसार माध्यमाचा वापर आणि विद्यार्थ्यांची सर्जनशीलता यामध्ये धनात्मक मध्यम प्रतीचा सार्थक सहसंबंध आहे.

२३) प्रसार माध्यमाचा वापर आणि विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ यामध्ये धनात्मक घनिष्ठ सार्थक सहसंबंध आहे.

२४) प्रसार माध्यमाचा वापर आणि विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक यामध्ये धनात्मक घनिष्ठ सार्थक सहसंबंध आहे. अर्थात प्रसार माध्यमाच्या उचित वापरामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्येही वाढ होते.

२५) प्रसार माध्यमाचा वापर आणि मुले आणि मुलींची सर्जनशीलता यामध्ये धनात्मक मध्यम प्रतीचा सार्थक सहसंबंध आहे.

२६) प्रसार माध्यमाचा वापर आणि मुलांच्या मानसिक स्वास्थ्यामध्ये धनात्मक मध्यम प्रतीचा सार्थक सहसंबंध तर प्रसार माध्यमाचा वापर आणि मुलींच्या मानसिक स्वास्थ्यामध्ये धनात्मक घनिष्ठ सार्थक सहसंबंध आहे. प्रसार माध्यमाच्या वापरानुसार मुले आणि मुली दोघांच्याही मानसिक स्वास्थ्यामध्ये वाढ होत असली तरी मुलांच्या तुलनेत मुलींमध्ये ही वाढ अधिक सकारात्मक असल्याचे दिसून येते.

२७) प्रसार माध्यमाचा वापर आणि मुलांच्या शैक्षणिक संपादणूक यामध्ये धनात्मक मध्यम प्रतीचा सार्थक सहसंबंध तर प्रसार माध्यमाचा वापर आणि मुलींच्या शैक्षणिक संपादणूक यामध्ये धनात्मक घनिष्ठ सार्थक सहसंबंध आहे.

२८) प्रसार माध्यमाचा वापर आणि शहरी तसेच निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांची सर्जनशीलता यामध्ये धनात्मक मध्यम प्रतीचा सार्थक सहसंबंध आहे. तात्पर्य प्रसार माध्यमाच्या वापरानुसार शहरी आणि निम-शहरी दोन्ही क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेमध्ये वाढ होत असली तरी ती मध्यम स्वरूपाची आहे.

२९) प्रसार माध्यमाचा वापर आणि शहरी तसेच निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ यामध्ये धनात्मक घनिष्ठ सार्थक सहसंबंध आहे. अर्थात प्रसार माध्यमाच्या वापरानुसार शहरी आणि निम-शहरी दोन्ही क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ सकारात्मक वाढ होते.

३०) प्रसार माध्यमाचा वापर आणि शहरी तसेच निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक यामध्ये धनात्मक घनिष्ठ सार्थक सहसंबंध आहे. तात्पर्य प्रसार माध्यमाच्या वापरानुसार शहरी आणि निम-शहरी दोन्ही क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीत सकारात्मक वाढ होते.

## ५.३ सामान्य निष्कर्ष :

माध्यमिक स्तरावरील अधिकांश विद्यार्थी प्रसार माध्यमांचा अतिशय जास्त प्रमाणात वापर करतात. यामध्ये मुलींच्या तुलनेत मुलांचे तसेच शहरी क्षेत्राच्या तुलनेत निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून आले.

प्रसार माध्यमाचा उचित वापर करणाऱ्या आणि अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता, मानसिक स्वास्थ आणि शैक्षणिक संपादणुकीमध्ये सार्थक फरक असून प्रसार माध्यमांचा उचित वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत अति वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, मानसिक स्वास्थ आणि शैक्षणिक संपादणूक कमी प्रमाणात असल्याचे आढळून आले.

मुले आणि मुलींच्या सर्जनशीलता, मानसिक स्वास्थ आणि शैक्षणिक संपादणुकीमध्ये सार्थक फरक असून मुलांच्या तुलनेत मुलींमध्ये सर्जनशीलता, मानसिक स्वास्थ आणि शैक्षणिक संपादणूक अधिक असल्याचे निदर्शनास आले.

शहरी आणि निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता, मानसिक स्वास्थ आणि शैक्षणिक संपादणुकीमध्ये सार्थक फरक असून शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत निम-शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, मानसिक स्वास्थ आणि शैक्षणिक संपादणूक अधिक असल्याचे दिसून आले.

प्रसार माध्यमाचा वापर आणि विद्यार्थ्यांची सर्जनशीलता यामध्ये धनात्मक मध्यम प्रतीचा सार्थक सहसंबंध आहे तर विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ तसेच शैक्षणिक संपादणूक यामध्ये धनात्मक घनिष्ठ सार्थक सहसंबंध आहे. अर्थात प्रसार माध्यमाच्या उचित वापरामुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेमध्ये मध्यम प्रमाणात तर मानसिक स्वास्थ तसेच त्यांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये सकारात्मक वाढ होते. प्रसार माध्यमाच्या वापराचा सर्वाधिक चांगला परिणाम विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ व शैक्षणिक संपादणुकीवर दिसून आला.

## ५.४ शिफारशी

१) विद्यार्थ्यांनी प्रसार माध्यमाचा वापर कमी प्रमाणात करावा.

२) दूरदर्शनवर व भ्रमणध्वनी वर प्रसारीत होणारे अयोग्य कार्यक्रम पाहणे टाळावे.

३) प्रसार माध्यमाचा उपयोग विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक ज्ञानाची पातळी वाढविण्यासाठी करावा.

४) विद्यार्थ्यांनी संगणकाचा वापर स्पर्धा परीक्षा, शैक्षणिक प्रकल्प आणि इतर शैक्षणिक कार्यक्रमासाठी उपयोग करावा.

५) विद्यार्थ्यांनी Facebook चा वापर करणे टाळावे.

६) What'up चा उपयोग विद्यार्थ्यांनी आपले अर्धवट राहिलेले गृहकार्य पूर्ण करण्यासाठी तसेच अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी करावा.

७) Electronic Media चा वापर कमी करावा जेणे करून मुलांचे मानसिक स्वास्थ आणि सर्जनशीलतेवर त्याचा वाईट परिणाम होणार नाही.

८) इंटरनेट, गुगलचा वापर विद्यार्थ्यांनी शैक्षणिक माहिती अथवा एखाद्या विषयाची सखोल माहिती मिळविण्याकरिता करावा.

९) विद्यार्थ्यांनी प्रसार माध्यमांवर प्रत्येकच विषयासाठी अवलंबून राहू नये.

१०) प्रसार माध्यमांच्या ऐवजी विद्यार्थ्यांनी शैक्षणिक ज्ञान वाढविण्यासाठी पुस्तकांचा वापर करावा जेणे करून त्यांच्या सर्जनशीलतेमध्ये वाढ होईल.

**पालकांसाठी शिफारशी**

१) पालकांनी पाल्याला प्रसार माध्यमाचा उपयोग जास्त प्रमाणात करू देऊ नये.

२) प्रसार माध्यमांच्या अति वापरामुळे काय दुष्परीणाम होतात याची माहिती पाल्यांना देणे.

३) पालकांनी कोणत्या वयात मुलांना इंटरनेटचा वापर करावा हे ठरविणे आवश्यक आहे.

४) इंटरनेटचा वापर न करता आपली स्मरणशक्ती व सर्जनशीलता कशी वाढविता येईल हे मुलांना वेगवेगळी उदाहरणे देऊन सांगता येईल.

५) मुलांना पुस्तकांचे महत्त्व पटवून द्यावे.

६) इंटरनेटच्या वापरामुळे विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्ती कमी होत आहे हे त्यांच्या लक्षात आणून द्यावे.

**शासनासाठी शिफारशी**

१) शासनाने इंटरनेट वापरण्यासाठी विद्यार्थ्यांची एक विशिष्ट वयोमर्यादा निश्चित करावी.

२) इंटरनेटचा वापर कसा करावा यासाठी शाळेत काही उपक्रम राबवावे.

३) शासनाने पालकांना इंटरनेट विषयी जागरूक करायला पाहिजे.

४) शासनाने इंटरनेटच्या वापरामुळे कोणकोणते दुष्परीणाम होतात हे एखाद्या कार्यशाळेद्वारा विद्यार्थ्यांपर्यंत तसेच पालकांपर्यंत पोहचवावे.

५) शाळेतील विद्यार्थी इंटरनेटच्या जास्त आहारी जावू नये यासाठी शिक्षकांनी जागरूक असायला पाहिजे.

६) विविध पथनाट्य वा उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना इंटरनेटचे फायदे व तोटे दोन्ही सांगण्याचा प्रयत्न करावा.

## ५.५ पुढील संशोधनाची दिशा

१) माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रसार माध्यमाचा होणारा परीणाम एक अभ्यास.

२) माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्तीवर इंटरनेटचा होणारा परिणाम एक अभ्यास.

३) उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेवर प्रसार माध्यमाचा होणार एक परिणाम.

४) उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्यावर इंटरनेटचा होणारा परिणाम.

५) उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, मानसिक स्वास्थ आणि शैक्षणिक संपादणूक यावर प्रसार माध्यमाचा होणारा परीणाम एक अभ्यास.

## ५.६ प्रस्तुत संशोधनातील निष्कर्षाची पूर्व संशोधनातील निष्कर्षाशी तुलना

१) प्रसार माध्यमाचा वापर आणि विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणुक यामध्ये धनात्मक घनिष्ठ सार्थक सहसंबंध आहे.

Chadha, N.K. and Chandna, S. (१९९०) यांनी "Creativity, Intelligence and Scholastic Achievement : A Residual Study" ह्याचा अभ्यास केला त्यांना सृजनशीलता व बुद्धिमत्ता, सृजनशीलता व शैक्षणिक संपादन आणि बुद्धिमत्ता व शालेय संपादन यात सकारात्मक व सार्थक संबंध होते. प्रस्तुत अध्ययनातील निष्कर्ष आणि Chadha, N.K. and Chandna, S. यांना प्राप्त झालेल्या निष्कर्षात साधर्म्य असल्याचे दिसून येते.

२) शहरी आणि निमशहरी क्षेत्रातील मुलांच्या सर्जनशीलतेमध्ये सार्थक फरक असून शहरी क्षेत्रातील मुलांच्या तुलनेत निमशहरी क्षेत्रातील मुलांमध्ये सर्जनशीलता अधिक असल्याचे आढळून येते.

Choudhary G.G. (१९८३) यांनी "An investigation into the Trends of Creative Thinking Ability of pupils of Age Group ११ to १३+ in relation to to some Psycho-socio correlates" ह्याचा अभ्यास केला. त्यांना ग्रामीण आणि शहरी भागातील मुले आणि मुली यांच्या सर्जनशील विचार क्षमतेच्या सरासरीमध्ये

सार्थक फरक आढळून आलेला नाही. प्रस्तुत संशोधनातील निष्कर्ष व Choudhary G.G. यांना प्राप्त झालेले निष्कर्ष यामध्ये भेद दिसून आला आहे.

३) शहरी आणि निमशहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेमध्ये सार्थक फरक असून शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत निमशहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता अधिक असल्याचे आढळून येते.

Gupta, Krishna Kumari (१९८८) यांनी "The Creative development of secondary school children in relation to Sex, Inteligence and Urban and Rural background" ह्याचा अभ्यास केला. त्यांना विशेषतः वय ११ ते १५ वर्ष या काळात शहरी मुले ही ग्रामीण मुलांपेक्षा सृजनशीलतेच्या बाबतीत श्रेष्ठ आढळतात. प्रस्तुत संशोधनातील Gupta, Krishna Kumari यांना प्राप्त झालेले निष्कर्ष यामध्ये भेद दिसून आला आहे.

दिनांक :-

| | |
|---|---|
| **मार्गदर्शक** | **संशोधिका** |
| **डॉ. हृषीकेश दलाई** | **जयश्री प्र. सावळे** |
| **सहाय्यक प्राध्यापक**<br>पदव्युत्तर शिक्षण विभाग<br>क.का.सं.वि., रामटेक | एम.ए. (मानसशास्त्र), एम.एड्.,<br>एम.फिल |